P.V.G.'s

# Muktangan English School & Jr. College, Pune - 9

## Summative Written Test - II (2024-25)

## Standard - VII

**Subject - MARATHI** **Marks - 50**
**Date - 26/03/2025** **Time : 8.00 am to 10.00 am**

**प्रश्न १ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही २)** **(४)**

१. अमृत व इसाबमध्ये कोणकोणत्या गोष्टी सारख्या होत्या ?

२. वैष्णवीला गहिवरून का आले ?

३. शिवारामध्ये गेल्यावर मुलांनी कोणकोणती पिके व फळझाडे पाहिली ?

४. अमृतने कुस्ती खेळण्यास नकार का दिला ?

**प्रश्न २ अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(४)**

१. बालदिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून कोणाला बोलविण्यात आले होते ?

२. जुन्या कपड्यांपासून कोणकोणत्या वस्तू बनविता येतील ?

३. इसाबच्या वडिलांनी कोणाकडून कर्ज काढले ?

४. सोनालीच्या घरात वाचनाची आवड कोणकोणाला होती ?

**प्रश्न २ आ) खालील वाक्ये कोण कोणास म्हणाले ते लिहा.** **(२)**

१. ''खरंय, ते मला मारतील; पण मला वाचवायला आई आहे.''

२. ''हो नक्कीच. त्यासाठी आपल्यात कलात्मकता पाहिजे.''

**इ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द निवडून वाक्य पुन्हा लिहा.** **(२)**
**(वाढदिवस, अवांतर, सण, सुधारणा, सारख्याच)**

१. मला भारतातील सर्व स्त्रिया __________ आहेत.

२. होळीचा __________ होता.

३. तिने आजपर्यंत कधीच __________ वाचन केले नव्हते.

४. आज माझा __________ होता.

**प्रश्न ३ अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही १)** **(२)**

१. संत जनाबाईंनी आईच्या प्रेमाची कोणकोणती उदाहरणे दिली आहेत?

२) लेक घरात नसताना कवयित्रीची अवस्था कशी होते?

३) संत तुकारामांनी भोंदू साधूचे वर्णन कसे केले आहे?

**आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(३)**

१) काळ्या रात्रीला कशाची आशा लागते?

२) कवितेतील लेक केव्हा रुसून बसते?

३) शब्दांच्या घरात सगळे एकोप्याने कोणता खेळ खेळत होते?

**इ) खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.** **(३)**

लेक तांबडं कुंदन,
लेक ______________ गोंदण,
लेक ______________ पालवी,
लेक ______________ चंदन,
लेक ______________ मनाची,
सारी ______________ मिटते,
लेक असता ______________ ,
रोज समई पटते.

**प्रश्न ४ अ) खालील समानार्थी शब्दांच्या योग्य जोड्या जुळवा.** **(१)**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| १) मस्तक | अ. जल |
| २) पाणी | आ. निशा |
| | इ. डोके |

**आ) खालील विरुद्धार्थी शब्दांच्या योग्य जोड्या जुळवा.** **(१)**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| १) होकार | अ. गरम |
| २) उद्योगी | आ. नकार |
| | इ. आळशी |

**इ) खालील शब्दांचे लिंग बदला. (कोणतेही २)** **(१)**

१) म्हैस –
३) मेंढी –
२) मुले –
४) बंधू –

**ई) खालील शब्दांचे वचन बदला. (कोणतेही २)** **(१)**

१) आठवण –
३) पुरणपोळी –
२) वर्ग –
४) कार्यालये –

**उ) खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा. (कोणतेही २)** **(२)**

१) सफल होणे –
३) यथेच्छ ताव मारणे –
२) हातभार लावणे –
४) पारा चढणे –

**ऊ) खालील वाक्यांचा काळ ओळखा व लिहा (कोणतेही २)** **(१)**

**(पर्याय - वर्तमानकाळ, भूतकाळ, भविष्यकाळ)**

१) आमच्या शाळेत बालदिन साजरा झाला.

२) मी उन्हाळ्याच्या सुट्टीत गावी जाईन.

३) आम्ही लाडू खातो.

**ए) खालील वाक्यात योग्य विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही १)** **(१)**

१) मुलांनी आंबट गोड तुरट अशा विविध चवींचा आस्वाद घेतला

२) केशव घुटमळला पण बाकीच्यांनी त्याला चिथावले

**ऐ) खालील कंसात काही म्हणी दिलेल्या आहेत. दिलेल्या वाक्यांशी संबंधित म्हण ओळखा व लिहा.** **(१)**

(आगीतून उठून फुफाट्यात पडणे, पळसाला पाने तीनच, अति तेथे माती)

१) कुठल्याही गोष्टीचा अतिरेक केल्यास संपूर्ण नाश होतो. [ ]

२) सगळीकडे परिस्थिती समान असणे. [ ]

**ग) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखून लिहा.** **(२)**

१) <u>शाबास!</u> चांगले काम केलेस बाळ!

२) कुंदाचा पाय मुरगळला <u>म्हणून</u> ती शाळेत येऊ शकली नाही.

३) <u>पाटीलसर</u> आम्हांला गावशिवारात घेऊन <u>गेले.</u>

**प्रश्न ५ अ) पत्रलेखन** **(५)**

तुमच्या भावाला / बहिणीला वाचनाचे महत्त्व सांगणारे पत्र लिहा.

**किंवा**

**खालील मुद्दयांवरून कथा लिहा आणि कथेस योग्य ते शीर्षक लिहा.**

एक लाकूडतोड्या – जंगलात लाकडे तोडणे – ती विकून उदरनिर्वाह – एके दिवशी झाडे तोडताना कुऱ्हाड विहिरीत पडणे त्याचे रडत बसणे – विहिरीतून देवी येणे – लाकूडतोड्याचे म्हणणे ऐकणे – विहिरीतून सोन्याची कुऱ्हाड काढणे – लाकूडतोड्याचा कुऱ्हाड घेण्यास नकार – परत देवीने चांदीची कुऱ्हाड काढणे – लाकूडतोड्याचा नकार – देवीने आता लोखंडाची कुऱ्हाड काढणे – लाकूडतोड्या आनंदी – त्याच्या प्रामाणिकपणावर देवी प्रसन्न – तिन्ही कुऱ्हाडी लाकूडतोड्याला बक्षिस – तात्पर्य.

**आ) बातमीलेखन : खालील बातमी वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(४)**

**जनमत**

दि. ८ फेब्रुवारी २०२५

मुक्तांगण इंग्लिश स्कूल, पुणे येथे ७ फेब्रुवारी २०२५ रोजी 'संस्कृतपीठम्'चा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. याद्वारे शाळेमध्ये संस्कृत भाषेविषयी वेगवेगळे उपक्रम, स्पर्धा घेण्यात येणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. कल्याणी नामजोशी उपस्थित होत्या. त्यांनी संस्कृत भाषेचे महत्व सांगत ही भाषा सर्व क्षेत्रातील लोकांना कशी उपयोगी आहे, याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

१) कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कोणाला बोलविण्यात आले होते ?

२) बातमीमधील शाळेचे नाव काय आहे ?

३) प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कसे केले ?

४) कार्यक्रमाची सांगता कशाने झाली ?

**इ) गद्याकलन: खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(४)**

नीटनेटकेपणा हा फार महत्त्वाचा गुण आहे. आपण हातपाय व तोंड धुतले, स्वच्छ कपडे घातले आणि केस विंचरले, तर आपण चांगले दिसतो. घरातल्या वस्तू नीट ठेवल्या आणि केरकचरा काढला तर घर प्रसन्न दिसते. आपण जेव्हा घरातील वस्तू जागच्या जागी ठेवतो, तेव्हा प्रत्येक वस्तू कुठे आहे हे सर्वांना ठाऊक असते. म्हणून प्रत्येकाला हवी ती वस्तू चटकन मिळते. नीटनेटकेपणाची सवय लागल्यावर आपण आपल्या वस्तू जपून वापरतो. वीज, पाणी इ. गोष्टीही आपण जपून वापरतो.

**प्रश्न–**

१) कोणता गुण महत्त्वाचा आहे ?

२) आपण चांगले केव्हा दिसतो ?

३) आपण काय केले तर घर छान प्रसन्न दिसते ?

४) नीटनेटकेपणाची सवय लागल्यावर आपण काय करतो ?

**ई) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर १२-१५ ओळींत निबंध लिहा** **(६)**

१) माझा वाढदिवस.

२) पाऊस पडला नाही तर...

३) माझे आवडते शिक्षक / शिक्षिका.

■■■